7” x 9.5”

# अनघावार्ता

अंक दुसरा

जुलै २०१९

ना. ज. जाईल या सव्यासाची लेखकाचा
यांचा पंचविसावा कथासंग्रह ‘कस्तुरीमृग’




खाजगी वितरणासाठी

7” x 9.5”

अनघा प्रकाशन
ठाणे (पूर्व)

आम्ही लवकरच प्रकाशित करीत आहोत.

लेखिका सुधा अरोडा यांच्या गाजलेल्या निवडक कथांचा मराठी अनुवाद

# डेझर्ट फोबिया आणि इतर कथा

अनुवाद : डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे

श्री. चंद्रकांत मेहेर लिखित
**कोळी समाज-विहंगमावलोकन**
सागरी पर्यावरण संरक्षण कायदे, सीआरझेड
आणि मच्छीमार समाज अशा क्लीष्ट बाबींचे
अतिशय सोप्या भाषेत निवेदन
असलेले एक संशोधनपर पुस्तक.







श्री. चंद्रकांत मेहेर लिखित
**मांगेला - समाज आणि संस्कृती**
मांगेला समाजाचा अभ्यासपूर्ण इतिहास
भारतात या समाजाची मूळं कशी पसरलेली
आहेत यांचा तपशिलवार धांडोळा.

7" x 9.5"

# संभाजी सावंत
## यांची पुस्तके प्रकाशित झालीत

### दोन अंकी नाटके
















अनघा प्रकाशन
ठाणे (पूर्व)

### एकांकिका
















अजून त्यांची नाटके, एकांकिकांची पुस्तके काही कालावधीत प्रकाशित होतील.

7" x 9.5"

# अनघा प्रकाशन, ठाणे (पूर्व)

## लवकरच प्रकाशित होणारी पुस्तके




डॉ. प्रदिप कर्णिक




डॉ. प्रदिप कर्णिक




अरविंद वें. हेब्बार




डॉ. शितल शिवराज मालुसरे




मुरलीधर नाले

**संपादक**
विद्या नाले

**संपादन सहाय्य**
मुरलीधर नाले

**मुखपृष्ट सजावट**
रघुनाथ गुराम

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
अनघा प्रकाशन
१६, श्रीसदिच्छा
मीठबंदर रोड,
चेंदणी, ठाणे (पूर्व)

**अक्षरजुळणी**
अथर्व क्रिएशन, ठाणे
मो.नं. : ९८३३८३९२०३
९९२०९८६५३५

**मुद्रक**
संकल्प प्रिंटर्स, ठाणे

**खाजगी वितरण**
संपर्क : ९७६९६०३२३९, www.anaghaprakashan.com

- संपादकीय - विद्या नाले ...३
- अनघा प्रकाशनाचा चाळीसावा दिमाखदार सोहळा
  - डॉ. अनंत देशमुख... ४
- विज्ञान पुस्तकांच्या विश्वात - जोसेफ तुस्कानो...६

**पुस्तक परीक्षण**

- भावलेल्या विभुतींचे दर्शन - स्टॅन्ली गोन्साल्विस...११

**लेखक परिचय**

- डॉ. महेश केळुसकर - मुरलीधर नाले...१३

या अंकातील विचारांशी संपादक सहमत असतील असे नाही.

# रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळालेली आमची प्रकाशने

- ★ राजा थिबा - मधु मंगेश कर्णिक
- ★ मेघदूत - शरद काळे, I.A.S.
- ★ श्रीमद्भगवतगीता - शरद काळे, I.A.S.
- ★ कधी बहर कधी शिशिर - पं. यशवंत देव
- ★ स्मरण - डॉ. भारतकुमार राऊत
- ★ गीता आनंद यात्रा - डॉ. भारतकुमार राऊत
- ★ विभ्रम - डॉ. विलास खोले
- ★ विमर्श - डॉ. विलास खोले
- ★ सुलोचना - वसंत भालेकर
- ★ वटवृक्षाच्या सावलीत - डॉ.एन.जी.राजूरकर
- ★ दीपस्तंभ - डॉ. एन. जी. राजूरकर
- ★ वाचा आणि वेचा - डॉ. विजय पांढरीपांडे
- ★ शिक्षण समजून घेतांना - डॉ.नीता पांढरीपांडे
- ★ खिरमट - डॉ. महेश केळुसकर
- ★ टीझर - डॉ. मोहिनी वर्दे
- ★ नर्गिस - रमेश उदारे
- ★ संजीवन पाथेय - डॉ. व्ही. के. गोकाक
- ★ अमृता प्रीतम - चंद्रकांत भोंजाळ
- ★ विज्ञानवाटा - जोसेफ तुस्कानो
- ★ यशवंतराव चव्हाण जडणघडण
  संपादन - मधु मंगेश कर्णिक
- ★ हिमशिखरांच्या सान्निध्यात - प्रकाश लेले
- ★ स्वरांत - भारत सासणे
- ★ श्वास आणि इतर कथा - माधवी घारपुरे
- ★ सुखालाही भोवळ आली - डॉ. प्रदीप कर्णिक

## संपादकीय

अनघा वार्ताचा हा दुसरा अंक आपल्याला देतांना मला अतीव आनंद होत आहे. अनघाची वाटचाल सुरु झाल्यानंतर दरवर्षी नवीन नवीन लेखकांची त्यात भर पडत गेली आणि मला सांगायला आनंद वाटतो की, अनघा प्रकाशनाकडे लिहिणारे लेखक त्यांच्या सान्निध्यातील लेखकांना अनघा प्रकाशनाची वाट दाखवू लागलेत व अशा प्रकारे ४० वर्षाच्या कालावधीत अनघा प्रकाशनाचा वृक्ष हा खऱ्या अर्थाने डौलदार झाला. अनघा प्रकाशनात मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, जळगाव, अहमदनगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील साहित्यिकांनी तर आपली पुस्तके प्रकाशनासाठी दिलीतच त्याशिवाय बेळगाव, बंगलोर, इंदूर, हैद्राबाद येथील साहित्यिकांची पुस्तके देखील प्रकाशनाला मिळाली आहेत. मराठी वाङमयातील कथा, कविता, कादंबरी, ललित, विज्ञान, सिनेमा, नाटक, पाककला या प्रकारांबरोबरच मल्याळी, हिंदी साहित्यातील उत्कृष्ट साहित्याचे मराठीत भाषांतरीत करून काही पुस्तके अनुवादित करून प्रकाशित करण्याचे स्वप्न देखील प्रत्यक्षात उतरू शकले आहे.

पारंपारिक विषयाहून वेगळी परंतु मराठी रसिकांच्या वाचनसंस्कृतीची आवड लक्षात घेऊन दर्जेदार मराठी पुस्तके प्रकाशित करता यावीत हाच दृष्टीकोन ठेवून अनघा प्रकाशनाने आपली वाटचाल चालू ठेवली आहे. मराठी रसिकांचा मिळणारा प्रतिसादच आमच्या वाटेला प्रोत्साहक बनवतो. अनघा प्रकाशनाच्या पुढच्या प्रवासात वेगवेगळ्या लेखकांची उत्कृष्ट पुस्तके मिळविण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. मराठी रसिकांच्या पसंतीस उतरतील अशी पुस्तके आमच्याकडून प्रकाशित व्हावी हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

**- विद्या नाले**

# 'अनघा प्रकाशन' चा चाळीसावा दिमाखदार प्रकाशन सोहळा



अनघा प्रकाशन, ठाणे या मराठीतील एका प्रतिष्ठित प्रकाशनाने नुकतीच चाळीस वर्षे पूर्ण केली. प्रारंभीच्या काळात विजय तेंडुलकर यांच्यासारख्या प्रयोगशील लेखकांचा स्नेह आणि सहकार्य मिळवण्यात श्री. मुरलीधर नाले हे यशस्वी झाले. ते स्वत: (आताच्या) मंत्रालयात अधिकारी म्हणून कामाला होते आणि त्यातही नियोजन सारख्या व्यस्त विभागात ते कार्यरत असूनही अनेक नामवंत साहित्यिकांशी त्यांची मैत्री होती. त्यातून त्यांनी गेली ४०वर्षे नियतकालिक चालविले त्याबरोबरच पुढे पुस्तक प्रकाशनावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. आजवर या प्रकाशनाने ८०० पुस्तके प्रकाशित केली आहेत. या चाळीस वर्षांमध्ये त्यांनी कै. अरुण साधू, पं. यशवंत देव, डॉ. विजय पांढरीपांडे,, मधु मंगेश कर्णिक, सुलोचना अशोक राणे, इसाक मुजावर, डॉ. भारतकुमार राऊत, डॉ. मोहिनी वर्दे, सौ. माधवी घारपुरे, डॉ. महेश केळुसकर आणि अनेक मान्यवर लेखकांची पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये सुप्रसिद्ध साहित्यिक आणि 'कोकण मराठी साहित्य परिषदे' चे संस्थापक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचे मार्गदर्शन आणि सहवास त्यांना लाभत आहे. त्यामुळे मुंबई पुण्याकडील मराठी प्रकाशनाच्या मध्यवर्ती धारेत आता 'अनघा प्रकाशना'ने स्वत:ची नाममुद्रा उठवायला सुरुवात केली आहे.

आपली चाळीस वर्षांची पूर्तता एका अनोख्या ढंगात साजरी करण्याची कल्पकता त्यांनी दाखवली. त्या करिता मधुभाईंच्या दीर्घकालीन लेखनकर्तृत्वाचा पट वाचकांच्या लक्षात यावा याकरिता 'वेचक

मधु मंगेश कर्णिक', निवडक मधु मंगेश कर्णिक भाग - १ व भाग - २ आणि 'कोकण मराठी साहित्य परिषदे'चे विद्यमान अध्यक्ष डॉ. महेश केळुसकर यांची 'दशावतार', 'चित्रकथी', 'माझा आवाज' आणि लळित अशी चार पुस्तके एकदम प्रकाशित करण्याचा घाट त्यांनी घातला आणि तो उत्तमरित्या सिद्धीस नेला. ठाणे येथील सहयोग मंदिर येथे दिनांक १४ एप्रिल २०१९ रोजी संध्याकाळी एका दिमाखदार प्रकाशन समारंभात त्यांनी ही पुस्तके प्रकाशित केली. यावेळी 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' या भारतातील अग्रगण्य नाट्यविषयक संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री वामन केंद्रे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, मधु मंगेश कर्णिक, डॉ. महेश केळुसकर, डॉ. विलास खोले, डॉ. अनंत देशमुख हे उपस्थित होते.

श्री. नाले (सिनीअर) यांनी प्रारंभी उपस्थितांचे स्वागत करून 'अनघा प्रकाशन' च्या चाळीस वर्षांच्या वाटचालीचा आढावा श्रोत्यांसमोर मांडला. श्री. अमोल नाले यांनी गेल्या काही वर्षांमध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकांसंबंधी, त्यांना मिळणाऱ्या प्रतिसादासंबंधी, आपल्या पुढील संकल्पनांसंबंधी माहिती दिली. मधुभाई आणि डॉ. महेश केळुसकर यांच्या मार्गदर्शनाचा दोघांनीही कृतज्ञतापूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर 'निवडक मधु मंगेश कर्णिक' या पुस्तकसंचाविषयी आणि त्या निमित्ताने मधु मंगेश कर्णिक यांच्या माणूस आणि लेखक म्हणून असलेल्या वैशिष्ट्याविषयी डॉ. विलास खोले यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण रीतीने विवेचन केले. तेव्हा 'मधुभाईंना पद्मश्री मिळाली, मात्र भारतीय पातळीवरील पुरस्कारांनी हुलकावणी दिली' अशी खंत त्यांनी बोलून दाखवली.

'दशावतारी नाटक', 'चित्रकथी', 'लळित' या पुस्तकांविषयी डॉ. अनंत देशमुख यांनी आपले विचार मांडले. 'डॉ. महेश केळुसकर यांच्या व्यक्तित्वाला अनेक पैलू असून आकाशवाणीवरील अधिकारी, कथाकार, कवी, कादंबरीकर हे त्यांचे आजवर ज्ञात असलेले पैलू आहेत. पण त्याच बरोबर त्यांच्यात एक अव्वल दर्जाचा संशोधक दडलेला आहे. १९९५ साली मुंबई विद्यापीठातून त्यांनी 'मालवणी लोककला' प्रकारावर संशोधन करून प्रबंधलेखन केले तेव्हाच सिद्ध झाले आहे. मराठी नाटक आणि रंगभूमीच्या मूलारंभाचा शोध घेण्याचा नाना दिशांनी प्रयत्न होत आहेत अशा वेळी केळुसकरांचे हे संशोधन पुस्तकरुपाने पुढे येत आहे. त्यातील त्यांच्या मूलभूत निरीक्षण, निष्कर्षांमुळे पुढच्या अभ्यासकांना अभ्यासाच्या नवनव्या दिशा निश्चितच सापडतील' असेही ते म्हणाले.

**पृष्ठ १४ वर...**

# विज्ञानपुस्तकांच्या विश्वात

मायबोली मराठीच्या मुख्य प्रवाहात विज्ञानलिखाणाचा प्रांत समृद्ध होत आहे ही एक स्वागतार्ह बाब आहे. विज्ञान लेख, ललितविज्ञान, विज्ञानकथा, विज्ञानकविता, विज्ञानगोष्टी अशा विविध प्रकारचे लिखाण पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे आणि वाचकांची जिज्ञासापूर्तीच नव्हे तर मनोरंजनदेखील करत आहे. आजच्या विज्ञान युगातील ती एक अगत्याची नि महत्वपूर्ण बाब आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाची विविध कवाडे उघडी होऊन, मानवी जीवन सुखसोयीचे होत आहे व त्याचा भौतिक लाभ घेताना माणसाची मानसिकतादेखील वैज्ञानिक दृष्टीकोनाने व्यापलेली असावी नि त्यासाठी या विज्ञान पुस्तकांचा हातभार लागत आहे. प्रस्तुत धांडोळा हा केवळ वानगीदाखल आहे, हिमनगाच्या टोकासारखा !

तशी मराठीमध्ये विज्ञानसाहित्याची बऱ्यापैकी परंपरा आहे. पण, १९७५ मध्ये कराड येथे भरलेल्या अ.भा.सा. संमेलनात स्व. दुर्गाबाई भागवत यांनी अध्यक्षीय भाषणात डॉ. जयंत नारळीकर यांच्या 'यक्षाची देणगी' या विज्ञानकथा संग्रहाचे जाहीर कौतुक केले आणि मराठी साहित्यदरबारी विज्ञानसाहित्याची दखल मोठ्या प्रमाणात घेण्यात येऊ लागली. सर्व प्रकारची क्षितिजे मराठी साहित्यात यावीत, असे त्यांनी आवाहन केले होते. पूर्वी दिवाळी अंकात ३०० ते ७०० शब्दांची मर्यादा घालून विज्ञानकथा वा लेख पाठवा असे लेखकांना आवेदन पाठवून विज्ञान साहित्याचा कोटा भरून काढला जायचा. आज दिवस पालटले आहेत. विज्ञान-साहित्य दिवाळी अंकाचं मानबिंदू बनलेला आहे व भल्या मोठ्या कथा त्यात मानाने मिरवत असताना आढळतात. 'मराठीतील आयजॅक आसिमोव' म्हणून गौरविले जाणारे ज्येष्ठ विज्ञानसाहित्यिक निरंजन घाटे यांचा, १८० पुस्तके प्रकाशित केल्याबद्दल १६ जानेवारी २०१७ रोजी पुण्यात सत्कार झाला होता, त्या घटनेचा इथे गौरवाने उल्लेख करावासा वाटतो.

ख्यातकीर्त खगोलशास्त्रज्ञ व ज्येष्ठ विज्ञानलेखक डॉ. जयंत नारळीकर म्हणतात, त्याप्रमाणे "विज्ञान हा केवळ काही विचारवंताच्या अभ्यासाचा विषय राहिला नसून तो आपण सर्वांच्या जीवनातला एक महत्वाचा घटक झाला आहे. सकाळी उठल्यापासून (जर घड्याळाच्या गजराने उठत असाल, तर त्या पूर्वीपासून !) रात्री झोपेपर्यंत आपल्या दिनचर्येत विज्ञानाचे पडसाद किती तऱ्हेने उमटतात, हे तुम्हीच पडताळून पाहा, म्हणजे विज्ञानाचा पसारा वाढत चाललाय, हेही तुमच्या ध्यानात येईल. या पसाऱ्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटले पाहिजे. "मोठ्यांची मने पूर्वग्रहदूषित असतात, तेव्हा मुलांवर










त्यांच्या बालपणापासून विज्ञान-दृष्टीकोण बिंबवला पाहिजे,” असेही त्यांना वाटते. मुलांच्या मनाची पाटी कोरी असते व त्यावर गिरवलेली अक्षरे त्यांच्यासाठी संस्कार असतात. त्याच्यासाठी मनोरंजक पद्धतीने विज्ञानाची माहिती पेश केली तर त्यांच्या उत्सुकतेला खतपाणी घातले जाऊ शकते. विज्ञान दृष्टीकोण ही काही किचकट बाब नसून ‘तर्क, निरीक्षण आणि निष्कर्ष’ यांनी युक्त अशी प्रक्रिया होय.. त्यासाठी विज्ञान-कथा, ललित-लेख, विज्ञान-गोष्टी, विज्ञानकविता, विज्ञान कादंबऱ्या यांची आवश्यकता आहे. तसेच, या प्रकारच्या साहित्याची समीक्षकांनी आवर्जून दखल घ्यायला हवी. हे सारे घडण्यासाठी साहित्य संमेलनात विज्ञानसाहित्य आणि त्याशी निगडीत कार्यक्रम यांची तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योजना व्हायला हवी. त्यानिमित्ताने, संशोधक तसेच विज्ञान लेखक यांचा जनसामान्य व विद्यार्थ्यांशी संपर्क होऊ शकतो. त्यांचे कुतूहल शमविता येते. शिवाय, सरकार दरबारी कररूपाने जो पैसा भरला जातो, त्याचे नेमके काय होते हे सकलांना कळू शकते.

गद्यविज्ञान लिखाणात ढोबळ मानाने दोन भाग पडतात. जे लेखन केवळ शास्त्रोक्त असते, ते विज्ञान शिकविण्यासाठी तयार केलेले असते. ललितविज्ञान लिखाणाला ललित्याचा साज असतो नि विज्ञानाचा तोंडवळा असतो. त्यातील विज्ञानाचा वापर वाचकांच्या ज्ञानात भर घालणारा असतो. लालित्यपूर्ण शैलीत लिहिले जाणारे विज्ञानलेख वाचकांचे कुतूहल शमवित असतानाच, त्यांचे मनोरंजन करत असते. शिकविणे हा ललित साहित्याचा हेतू नसतो. डॉ. जयंत नारळीकर यांचे ‘आकाशाशी जडले नाते’ व ‘सृष्टीविज्ञान गाथा’ हे ग्रंथ आणि ‘विज्ञान आणि वैज्ञानिक’ व ‘विज्ञानाची गरूडझेप’ ही पुस्तके अनुक्रमे या दोन साहित्य प्रकारातील फरक ठळकपणे स्पष्ट करतात. अचूकता हा विज्ञानाचा प्राण असल्यामुळे, या ललित साहित्यात जे काही विज्ञान डोकावते, त्याचा अचूकपणा महत्वाचा असतो. त्याला परा विज्ञानाचा वा बुवाबाजीचा मुलामा लागता कामा नये, याचा विज्ञान लेखकांना

कटाक्ष पाळावा लागतो.

विज्ञानकथा व विज्ञान कादंबरी हा अलीकडच्या काळात मराठीत रूढ झालेला लोकप्रिय प्रकार आहे. डॉ. जयंत नारळीकर, डॉ. बाळ फोंडके, निरंजन घाटे, स्व. लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर, प्रा. माधुरी शानभाग, डॉ. अरूण मांडे, रेखा बैजल, डॉ. मेघश्री दळवी, यासारखी मातबर मंडळी आपल्या कथासंग्रह आणि कादंबऱ्यांनी या क्षेत्रात कमालीची समृद्धी आणीत आले आहेत. तसेच, डॉ. संजय ढोले, अरूण हेबळेकर, मनोहर दीनानाथ, डॉ. द. व्य. जहागीरदार, डॉ. यशवंत देशपांडे, विवेक भालेराव, अविनाश कोलारकर, शुभदा गोगटे या व अन्य लेखकांचे विज्ञान कथासंग्रह लोकप्रिय झाले आहेत.

समाजात विज्ञानविषयक जाण पसरविणाऱ्या या ललित गद्यविज्ञानाबाबत हीच परिस्थिती अहो. 'घरातले विज्ञान' (ना. वा. कोगेकर)', 'विचित्र विज्ञान' (डॉ. बाळ फोंडके), 'हसरे विज्ञान' (सुबोध जावडेकर), 'वाळूचे गाणे' (लक्ष्मण लोंढे), 'विज्ञानवाटा' (जोसेफ तुस्कानो), 'भ्रम आणि निरास' (डॉ. नरेंद्र दाभोळकर), 'टपाल तिकीटातून विज्ञान' (प्रा. प्रभाकर सोवनी), 'संगणक-युग' (अच्युत गोडबोले), 'एक रानवेड्याची शोधयात्रा' (कृष्णमेघ कुंटे), 'आरोग्याचा अर्थ' (डॉ. आनंद नाडकर्णी), 'विज्ञानाच्या प्रकाशात' (डॉ. र.गो.लागू), 'हिप्नोटिसमचे सामर्थ्य' (मनोहर नाईक); अशी कितीतरी नावे सहज नजरेसमोर येतात.

त्यात सुबोध जावडेकरांचे 'हसरे विज्ञान' तर ललित गद्य लिखाणाचा एक अस्सल मासला म्हणता येईल. विज्ञानाच्या मजेशीर हसऱ्या भागावर प्रकाश टाकणारे, हलक्या-फुलक्या भाषेत लिहिलेले विज्ञानाकडे खेळकर नजरेने बघणारे हे पुस्तक आहे. त्यात कवितेतले विज्ञान आहे, तसेच विज्ञानातले काव्यदेखील आहे. काव्य-शास्त्र-विनोदाची मैफल भरविणारे, मराठीतील अशा प्रकारचे हे पहिलेच पुस्तक होय, असा मॅजेस्टिक प्रकाशनाचा दावा आहे. 'गुगली', 'वामनाचे चौथे पाऊल', 'संगणकाची सावली', हे त्यांचे कथासंग्रह गाजले आहेत.

डॉ. बाळ फोंडके हे मराठीतले ज्येष्ठ नि चतुरस्त्र विज्ञान लेखक आहे. ते सातत्याने ललित विज्ञान प्रसूत करत असतात. विज्ञानाची सूत्रे हसत-खेळत, शिळोप्याच्या गप्पा करता-करताही समजावून देता येतात हे त्यांनी दाखवून दिले आहे. 'विज्ञान संवादिनी' व (वि)चित्र विज्ञान' ही त्यांची पुस्तके त्याची चपखल उदाहरणे होत. 'प्रतिमा', 'युरेका', 'अमानुष', 'चिरंजीव', 'गुड बाय अर्थ', 'गोलमाल', 'खिडकीला डोळे असतात', 'अहेरचा प्रयोग'; हे त्यांचे कथासंग्रह नावाजले आहेत.

ज्येष्ठ विज्ञानलेखक निरंजन घाटे यांनी तर विपुल प्रमाणात ललित लिखाण केले आहे. त्यांच्या चार-पाच पुस्तकांचा वानगीदाखल उल्लेख करत आहे. 'वेध पर्यावरणाचा' हा सध्याच्या कळीच्या विषयावरचा ललितग्रंथ आहे. सर्व सामान्यांना समजेल, अशा सोप्या भाषेत नि विस्तृत विवेचनाने हा ग्रंथ वाचनीय झाला आहे. 'उत्क्रांतीची नवलकथा' मध्ये त्यांनी त्या गहन विषयावरील विविध छटा उलगडवून दाखविल्या आहेत. 'मानवाच्या शोधांची कहाणी' या पुस्तकात आपणा सर्वांना पडलेल्या 'मी जन्माला कसा आलो ?' या प्रश्नाचा मागोवा घेतला आहे. 'शरीरवेध' मध्ये व्याधी-दुखण्याचा धांडोळा आहे. त्यांच्या प्रचंड ग्रंथभांडारात १५ पेक्षा जास्त कथासंग्रह आणि १ डझनभर विज्ञान कादंबऱ्या या प्रकाशित आहेत.

एक गोष्ट इथे नमूद करावीशी वाटते ती ही की निरनिराळ्या विज्ञान लेखकांनी विविध नियतकालिकात लिहिलेल्या ललितविज्ञान स्तंभातील लेख एकत्रित होऊन त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'मेंदूच्या मनात'; सुबोध जावडेकर (रविवार लोकसत्ता)', 'एनर्जी-सिनर्जी' - शैलेश माळोदे (रविवार-नवशक्ती), 'पर्यावरण दैनंदिनी' - डॉ. सिद्धीविनायक बर्वे (आपलं पर्यावरण), 'भविष्याची आशा' जोसेफ तुस्कानो (सायन्स टूडे पुरवणी, प्रहार/टेक ओवर पुरवणी, सकाळ) ही काही उदाहरणे होत. तसेच, मराठी विज्ञानकथांचे संग्रहदेखील प्रकाशित आहेत. 'मराठीतील निवडक विज्ञानकथा '(निरंजन घाटे-स्नेह वर्धन प्रकाशन), 'यंत्रमानव' (अ.पा.देशपांडे व सुबोध जावडेकर-मनोविकास प्रकाशन), 'वेधक विज्ञानकथा' (जोसेफ तुस्कानो - डिंपल पब्लिकेशन) ही त्याची दोन-तीन उदाहरणे आहेत.

वाचकांना विज्ञानविषयक सजग करण्यासाठी नावाजलेले विज्ञानलेखक स्व. लक्ष्मण लोंढे यांनीदेखील ललित गद्यप्रकार खूप चांगल्या रीतीने हाताळला होता. त्यांची 'वाळूचं गाणे', 'विज्ञानयात्रा', 'आभाळ फाटलंय', 'दूर क्षितिजापलीकडे', 'नव्या शतकाच्या उंबरठ्यावर', 'काऊंट डाऊन' ही पुस्तके त्याची साक्ष आहेत.

गेल्या शतकात, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांतिकारक शोध लागले, तरीही एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर शाळांमधील विद्यार्थ्यांत विज्ञानासंबंधी आवड कमी होत आहे, असे जगभरातील सर्वेक्षणात आढळले आहे. झटपट कमाई देणाऱ्या या कमर्शियल करियरकडे तरूणाईचा ओढा वाढत आहे. मूलभूत विज्ञान एकप्रकारे अडगळीत पडल्यासारखे झाले आहे. विद्यार्थ्यात विज्ञानासंबंधी तरूणाईचा ओढा वाढत आहे. मूलभूत विज्ञान एकप्रकारे अडगळीत पडल्यासारखे झाले आहे. विद्यार्थ्यांना

विज्ञानाभिमुख करण्यासाठी सोपे, सहज समजणारे विज्ञानसाहित्य गरजेचे आहे. हे लिखाण मनोरंजनात्मक असणे, ही त्याची पहिली कसोटी होय. या साहित्याचे महत्व समजले तरच त्याचा प्रसार होऊ शकेल. त्यासाठी बालविज्ञान गोष्टी / बालरंजन साहित्य मोलाचे हातभार लागू शकतात. ज्येष्ठ विज्ञान लेखक निरंजन घाटे यांनी मुलांसाठी विपुल लिखाण केले आहे. 'शोधवेडे शास्त्रज्ञ', 'विज्ञानिक साहसकथा', 'प्राण्यांचे जग', 'आकाशगंगा', 'हवाई युद्ध', 'यंत्रमानव', 'दीपशिखा', 'अणूच्या वेगळ्या वाटा', ही त्यांच्या काही मोजक्या पुस्तकांची नावे होत. त्याशिवाय, डॉ बाळ फोंडके (विज्ञान नवलाई), राजीव तांबे (मनोरंजनात्मक विज्ञान), सुधीर आणि नंदिनी थत्ते (बालविज्ञान साहित्य चळवळ), जोसेफ तुस्कानो (बालविज्ञान गोष्टी); ही चटकन आठवणारी नावे आहेत.

विज्ञान एक दृष्टी आहे. तसेच ती अनुभवाची विशिष्ट संगती आहे. जगातील प्रत्येक बाब कुणाला वैज्ञानिक दृष्टीतून पाहता येईलच असे नाही. पण ह्या दृष्टीतून आपल्या प्रतिक्रियांचे काव्यात्म विश्लेषण करता आले तर विज्ञानकविता जन्म घेऊ शकते. विज्ञान कविता एक व्यापक संकल्पना आहे. परमाणूच्या पोटापासून ते जगाच्या पाठीपर्यंत सर्वत्र तिचा वावर आहे. विज्ञान कविता एक खूळ नसून बदलत्या काळातील भावविश्वाची अपरिहार्यता आहे. विज्ञानाच्या दृष्टीतून विज्ञान संगतीतून आपला अनुभव काव्यात्म रूप घेऊ शकतो. हे संगती संकर सौंदर्यशाली नि ताकदीच्या कलाकृतीची निर्मिती होण्यास कारणीभूत ठरू शकते, ह्याची होतकरू लेखक-कवींनी दखल घ्यायची आहे. आजच्या विज्ञानयुगात समाजात वैज्ञानिक दृष्टीकोण बिंबविणे ही एक महत्वपूर्ण व अगत्याची बाब बनली आहे. विशेषत: मुलांना गद्यापेक्षा गेयता असलेले पद्य जास्त भावते. गाणे आणि कविता त्यांच्या खेळाचा भाग होऊन जातो. त्यांना कवितातून विज्ञानाची माहिती देणे ही एक ही कसरत असते. प्रा. देवबा पाटील यांच्यासारखे विज्ञानाचे तरूण शिक्षक ('आभाळाचे गुपित') असा प्रयत्न करत आहेत, त्यांना शुभेच्छा देऊ या.

- जोसेफ तुस्कानो.
ए- १४०२, आहुजा टॉवर्स, एक्सर रोड, बोरीवली) प. मुंबई - ४०००९१
संदेशवाहक : ९८२००७७८३६

# भावलेल्या विभूतींचे दर्शन

विज्ञान व ललित लेखक जोसेफ तुस्कानो हे उत्कृष्ट समीक्षक असल्याचा पडताळा देणारे 'व्यक्ती आणि विभूती' हे त्यांचे नवे पुस्तक. या पुस्तकातील सर्वच व्यक्तिचित्रे आस्वादक समीक्षेचा उत्तम नमुना ठरावीत. विश्वाचे आर्तगीत आळवणारे, गूढवादी कवी ग्रेस ('ग्रेस' फूल माणिक) ह्यांच्या कवितातून उभे केलेले, लेखकाला भावलेले 'ग्रेस' फूल चित्रण हा ग्रेस यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा नितांतसुंदर परिचय आहे. एकदा वाचून न समजणारे ग्रेस बऱ्याचदा अनेकदा वाचूनही उमजत नाहीत; मात्र तुस्कानोंनी घेतलेल्या त्यांच्या काव्यप्रवासाच्या सर्जनशोधातून दुर्बोध समजल्या जाणाऱ्या या कवीचे सामाजिक संवेदन व अंतरीचा आक्रोश वाचकांना सहज आकळत जातो. 'हा दु:खाचा महाकवी होतो'; 'मराठी कवितेला भाबडेपणातून बाहेर काढण्याचे काम ग्रेस यांनी केले, 'अशा शब्दांत जोसेफ तुस्कानो त्यांच्या कवितेचा रूपबंध स्पष्ट करून दाखवतात.

अशाच प्रकारे आपल्या जगण्याच्या मध्यमवर्गीय संदर्भाची उलथापालथ घडवून आणणारे बंडखोर कवी नामदेव ढसाळ ह्यांच्या कवितांचे ते मूल्यमापन करतात. एकदा अनंत काणेकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काव्य संमेलनात एक अनाहूत टॅक्सीचालक व्यासपीठावर जाऊन कविता वाचतो, तेव्हा सारे सभागृह स्तिमित होते. तिथे उपस्थित असलेले 'सत्यकथे' चे साक्षेपी संपादक राम पटवर्धन ह्या टॅक्सीचालकाच्या एकदम पाच कविता 'सत्यकथे' च्या पुढच्या अंकात छापतात ! हा चमत्कार घडविणारे प्रतिभावन कवी नामदेव ढसाळ! लेखक म्हणतात: 'ढसाळांच्या कवितेतील शब्द कोणत्याही शब्दकोशात सापडत नाहीत. त्यांनीच एक नवी डिक्शनरी जन्माला घातली. भाषेवर पकड, शब्दांची नजाकत, नवीन भाषेचा उद्‌भव आणि अनुभवाचा टोकदारपणा ही त्यांची वैशिष्ट्ये होती. 'शब्दांनीच घरेदारे पेटतात याची प्रचिती देणाऱ्या ढसाळांची सारी शब्दफुले रक्ताने पेटलेली होती. वंचितांचे दडपलेले आकाश आपल्या शब्दांतून मोकळे करणाऱ्या नामदेव ढसाळांची ही चित्तरकथा आहे.

मराठीत दलित साहित्याने ज्या पोटतिडिकीने गावकुसाबाहेरचे जीवन मांडले, त्याच आक्रमकतेने अमेरिकेत कृष्णवर्णीय महिलांना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टा आणि वांशिक भेदभावाच्या जखमा रोखठोकपणे कृष्णवर्णीय अमेरिकन कवियत्री माथा आंजेलो (४.४.१९२८ ते २५.५.२०१४) ह्यांनी उघड केल्या. त्यांचं जीवन व लेखनप्रवास वाचताना जगाच्या पाठीवरील दलित-शोषितांच्या वेदनांचे आर्त हुंकार अन् उसासे आपल्या सुखासीन निर्ममतेला हादरवून सोडतात.

प्रसन्न शैलीचे जादूगार व प्रगल्भ सामाजिक जाणिवांचे कवी शंकर वैद्य ह्यांच्या प्रत्यक्ष भेटीतून जाणवलेले त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग-रूप-पोत मांडत तुस्कानो यांनी त्यांच्या काव्याचाही विस्तृत आढावा घेतला आहे. 'वैद्यसर' म्हणून आपल्या जणू देवताला वाहिलेल्या ह्या भावांजलीतून मनोज्ञ कवी, रसज्ञ समीक्षक, कवितेचे अभ्यासक, उत्तम शिक्षक, प्रभावी वक्ते, ललित लेखक आणि कविसंमेलनाचे लोभस सूत्रसंचालन करणाऱ्या शंकर वैद्य यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व उभे करण्यात जोसेफ तुस्कानो यशस्वी झाले आहेत.

तसेच, ९१ वर्षे जगलेले व ६० वर्षे लिहीत राहिलेले 'इलेस्ट्रेटेड वीकली' चे संपादक खूशवंतसिंग या वल्लीचे 'खुश' खुशीत चित्रणही लेखकाने केले आहे. ते जगभर भटकत आणि 'मानवी पक्षीनिरक्षणाची' आपली हौस-फुल्ल करून घेत. असे त्यांचे समर्पक शब्दचित्र रेखाटतानाच ते त्यांचे इंग्रजीवरील प्रभुत्व, विनोदी शैली, प्रचंड वाचन, व्यासंग, जगभ्रमंती... असा त्यांच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा घांडोळाही घेतात.

सामान्य माणसाच्या कोंडमाऱ्याला आपल्या व्यंगचित्रातून वाट करून देणारे 'कॉमन मॅन' चे जनक आर. के. लक्ष्मण ह्यांचेही रोचक 'आर्कचित्र' तुस्कानो यांनी त्यांच्या व्यंगचित्रासह शब्दांकित केले आहे. त्यात त्यांच्या कुंचल्यातील अव्वल ताजेपणा, अनन्यसाधारण कल्पनाशक्ती व स्वभावातील 'अंतरीच्या नाना कळा' ही रेखाटल्या आहेत. ह्या शिवाय मदर तेरेसा, शिरीष पै, 'विज्ञानयुग' चे संपादक गजानन क्षीरसागर, निरंजन उजगरे, 'धनंजय' चे संपादक राजेंद्र कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार डॉ. रॉबी डिसिल्वा, अनंत सामंत, साहित्यिक बाळ राणे, आदी लेखक-कलावंतासोबतच शालेय गुरु फादर बर्नड भंडारी आणि स्वत:चे पिताश्री यांची स्मरणओळख साकारताना त्यांच्या आठवणीच नव्हे, तर त्यांच्या विचारातील, लेखनातील सौंदर्यस्थळेही ते उलगडून दाखवतात.

तपशीलबहुलता आणि अनलंकृत कथनशैली यामुळे हे पुस्तक वाचनीय झाले आहे.




**-स्टॅन्ली गोन्सालविस**

लेखक : जोसेफ तुस्कानो

मुखपृष्ठ : सुमन र. गुराम

प्रकाशक : अनघा प्रकाशन, ठाणे

(सौजन्य : महाराष्ट्र टाईम्स, ५ मे २०१९)

# झिनझिनाट कवी - डॉ. महेश केळुसकर



'झिन झिन झिनाट.... ' झिनझिनाट या कवितेनं अवघ्या महाराष्ट्राला वेड लावणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. महेश केळुसकर. कारण महाराष्ट्रातील रसिक काव्याच्या प्रांतातील दिग्गजांना कसे डोक्यावर घेतात याला इतिहास साक्षी आहे. कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, वसंत बापट, शंकर वैद्य, रमेश तेंडुलकर, सुरेश भट, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांच्यानंतर कवी ग्रेस, डॉ.महेश केळुसकर, अशोक नायगावकर, अशोक बागवे, अरूण म्हात्रे या कवींनी मराठी रसिकांच्या मनात चांगल्या परीने बस्तान बसविले. केळुसकरांनी गेल्या २५ वर्षातील प्रत्येक रविवार महाराष्ट्रातील काव्य रसिकांच्या सेवेसाठी खर्ची घातलेला दिसून येतो. याच काळात कोकण मराठी साहित्य परिषदेशी डॉ. केळुसकरांची नाळ जोडली गेली. कार्यकर्ता ते अध्यक्ष म्हणून कार्यरत असतांना शनिवार/रविवारची ठाण्याची संध्याकाळ बघण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही. कुठेही काव्यसंमेलनाला गेल्यावर रसिकांकडून या गाण्यासाठी त्यांना आग्रह असायचा.

फोंडा घाटातील एका लहानशा गावात जन्मलेल्या केळुसकरांचा जीवनप्रवास तसा खडतरच होता. शालेय शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण आटोपल्यावर नोकरीच्या प्रयत्नात त्यांना आकाशवाणीवर नोकरी मिळाली परंतु त्यांच्यातील कवी त्यांच्या मनाला शांतता लाभू देईना व त्यांच्या लेखणीतून एकाहून एक सरस कविता उमटू लागल्यात व मित्रांच्या आग्रहास्तव त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यांचे तत्कालीन घटनांवर आधारित सटारिकल काव्य हळूहळू प्रसिद्ध होऊ लागले. त्यांचा 'दूर डोंगरात दिवा लागतो' हा काव्यसंग्रह अनघा प्रकाशनास प्रकाशित करायला मिळाला.

त्यानंतर त्यांची कोकण मातृभूमी असल्यामुळे त्यांचे 'खिरमट' नावाचे ललित लेखांचे पुस्तक प्रकाशित झाले. अनघाच्या या पुस्तकाला देखील रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. केळुसकरांची गेल्यावर्षी ४ पुस्तके प्रकाशित झाली होती. यंदा देखील त्यांची 'माझा आवाज', 'दशावतार', 'ललित' व 'चित्रकथी' अशी चार पुस्तके अनघा प्रकाशन, ठाणे यांनी १४ एप्रिल २०१९ रोजी डॉ.वामन केंद्रे यांच्या हस्ते प्रकाशित केलीत.

आकाशवाणीत अधिकारपदावर काम करीत असतांना आपली कवितेची ऊर्मी त्यांनी जपली व ललित लेखनाची गाडी देखील चालू ठेवली. आजमितीला त्यांचे ७ कवितासंग्रह, २ कादंबऱ्या, १ कथासंग्रह, ५ ललितगद्य, ३ बालवाङ्मयाची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच ४ पुस्तके संपादित केली आहेत. मालवणी साहित्य संस्कृतीत निगडीत विषयावर त्यांचा प्रबंध मुंबई विद्यापीठाने मान्य केल्यावर त्यांना डॉक्टरेट ही पदवी प्रदान केली आहे. त्यांना त्या प्रबंधाबद्दल विद्यापीठाचा पुरस्कार देखील मिळालेला आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या निमित्ताने सर्वत्र त्यांचा काव्यसंध्येचा कार्यक्रम अविरत चालू आहे. आता तर ते आकाशवाणीतून निवृत्त झालेत, त्यामुळे मराठी साहित्यात मोलाची भर घालण्याचे काम त्यांच्याकडून नक्कीच होईल. तसेच महाराष्ट्रातील रसिकांना त्यांच्या रसाळ वाणीतून भाषणे ऐकायला तर मिळतीलच शिवाय कित्येक मराठी, बहुभाषी काव्यमंचातून त्यांच्या काव्याचा लाभ मिळेल याची खात्री वाटते.

**- मुरलीधर नाले**

---

**...पृष्ठ ५ वरून**

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकरांनी त्यांच्या भाषणाची सुरूवात मालवणीतून करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांनी शिक्षणाचं आणि वाचनाचं महत्त्व पटवून देतांना नामवंतांची पुस्तकं वाचणं किती गरजेचं आहे हे सांगून अनघा प्रकाशनाच्या उपक्रमांची प्रशंसा केली व शुभेच्छा दिल्या.

'मराठी लेखकांच्या लेखनात भारतीयच काय जागतिक दर्जाची गुणवत्ता आहे, पण हे त्या मंडळींपर्यंत पोहोचवण्यात आपण कमी पडतो. त्यासाठी आपण जे आणि जसे प्रयत्न करायला हवेत तसे आणि तितके करण्याचा बाबतीतली आपली उदासीनता आड येते, हे मी दिल्लीत जे अनुभव घेतो त्यावरून स्पष्टपणे सांगू शकतो. म्हणूनच मधुभाईंसारखे साहित्यिक ज्ञानपीठापासून दूर राहातात' असे कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्मश्री वामन केंद्रे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले.

सदर कार्यक्रमाला ठाण्यातील प्रतिष्ठित, साहित्यिक, पत्रकार तर हजर होतेच पण त्या बरोबर कोकणातीलही काही मंडळी आवर्जून उपस्थित होती. त्यांच्यापैकी रमेश चव्हाण यांनी मंचावर येऊन मालवणी पद्धतीने देवाला गाऱ्हाणेही घातले आणि तुतारीने त्यात रंग भरला.

**प्रा. अनंत देशमुख**

८६८९९७८७४४

## अनघा प्रकाशनाची २०१६ मधील शासनमान्य यादीतील पुस्तके

| अनु | ग्रंथाचे नाव | ग्रंथाचे लेखक | ग्रंथप्रकार | किंमत | शा. मा. नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | गर्भगिरीतील नाथपंथ | श्री. टी. एन. परदेशी | अध्यात्म | रु. ३०० | ५६/२०१६ |
| २ | श्रीमद्‌भगवद गीता | श्री. उमाकांत शिंदे | धार्मिक | रु. १५० | ९८/२०१६ |
| ३ | शिक्षण समजून घेताना | डॉ. नीता पांढरीपांडे | ललित | रु. २०० | १४३/२०१६ |
| ४ | औद्योगिक संबंध | श्री. बिपिन पाटील | ललित | रु. १८० | १६५/२०१६ |
| ५ | फिल्मीचक्कर | श्री. रमेश उदारे | चित्रपट | रु. १५० | २०६/२०१६ |
| ६ | सत्यशोधक | प्रा. पु. द. कोडोलीकर | ललित | रु. २०० | २३२/२०१६ |
| ७ | महदंबा | सौ. पदमावती जावळे | ललित | रु. २४० | २३६/२०१६ |
| ८ | स्मरणरंग | सौ. मुक्ता केणेकर | ललित | रु. २०० | २७६/२०१६ |
| ९ | स्वरांत | श्री. भारत सासणे | एकांकीका | रु. १५० | ३१७/२०१६ |
| १० | अग्निफुल | मुक्ता किणीकर | कादंबरी | रु. २०० | ३२३/२०१६ |
| ११ | श्वास | माधवी घारपुरे | कथा | रु. १६० | ३३०/२०१६ |
| १२ | अल्बम | श्री. अरविंद चव्हाण | कथा | रु. १८० | ३३१/२०१६ |
| १३ | शेगडी | श्री. दिलीप ठाकुर | ललित | रु. २२० | ३३३/२०१६ |
| १४ | नाव नसलेले नातं | डॉ. विजय पांढरीपांडे | ललित | रु. १८० | ३३६/२०१६ |
| १५ | राधा ही बावरी | श्री. लक्ष्मण लोंढे | ललित | रु.. २३० | ३४४/२०१६ |
| १६ | सुई कांदे पोहे सीसीडी | श्रीमती स्वाती लोंढे | कथा | रु. १६० | ३४५/२०१६ |
| १७ | चित्र आणि इतर कथा | प्रा. वैभव साटम | कथा | रु. १९० | ३५०/२०१६ |
| १८ | श्रेयसच्या आजोबांच्या गोष्टी | प्रा. वैभव साटम | कथा | रु.. ६० | ३५२/२०१६ |
| १९ | विविधा | सौ. मुक्ता केणेकर | ललित | रु. १९० | ३९६/२०१६ |
| २० | सिनेमाला चला तुम्ही | श्री. दिलीप ठाकुर | ललित | रु. २२० | ४०८/२०१६ |
| २१ | नमन | श्री. चंद्रकांत भोंजाळ | ललित | रु. १६० | ४१०/२०१६ |
| २२ | हे निळं आभाळ | श्री. रमेश दर्प | कविता | रु.. १४० | ४१०/२०१६ |
| २३ | लोकगीते | डॉ. नेताजी पाटील | काव्य | रु. २०० | ४२४/२०१६ |
| २४ | नर्गिस | श्री. रमेश उदारे | चरित्र | रु. १९० | ४४०/२०१६ |
| २५ | शतायुषी | श्री. विजय रेगे | चरित्र | रु. १४० | ४७३/२०१६ |
| २६ | देवाघरची लेणी | प्रा. वैभव साटम | कथा | रु. १७० | ४७३/२०१६ |
| २७ | नुसतं हसु नका | चंद्रसेन टिळेकर | ललित | रु. १४० | ४१५/२०१६ |
| २८ | मी होतो मी नव्हतो | श्री. विश्वनाथ शिरढोणकर | कादंबरी | रु.३०० | ६११/२०१६ |
| २९ | ऋणानुबंध | श्री. रमेश उदारे | ललित | रु. १७० | ६३७/२०१६ |
| ३० | सुखाचे सोबती | श्री. वि.शं. चौघुले | ललित | रु. २०० | ७९६/२०१६ |
| ३१ | मी आणि माझे सुह्रदय | श्री. वि. शं. चौघुले | ललित | रु. २०० | ७९७/२०१६ |
| ३२ | श्रीमंत व्हा | डॉ. नीता पांढरीपांडे | ललित | रु. २०० | ८२४/२०१६ |
| ३३ | यशवंतराव चव्हाण जडणघडण | संपादीत | चरित्र | रु. ३५० | १०१५/२०१६ |

## मोनिका प्रकाशनाची २०१६ मधील शासनमान्य यादीतील पुस्तके

| अ क | ग्रंथाचे नाव | ग्रंथाचे लेखक | ग्रंथाचा प्रकार | किंमत | शा. मा. नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावळा गोंधळ | श्री. सुभाष सुंठणकर | कथा | रु. १८० | ६७०/२०१६ |

## अनघा प्रकाशनाची २०१७ मधील शासनमान्य यादीतील पुस्तके

| अनु | ग्रंथाचे नाव | ग्रंथाचे लेखक | ग्रंथप्रकार | किंमत | शा. मा. नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | जावे संताचिया गावा | डॉ. नीता पांढरीपांडे | ललित | रु. २६० | १५४/२०१७ |
| २ | गंध मातीचा स्वाद सणांचा | सौ. वैशाली सरदेसाई | ललित | रु. २०० | १८९/२०१७ |
| ३ | समाजभान आत्मभान | डॉ. विजय पांढरीपांडे | ललित | रु. ३०० | २५६/२०१७ |
| ४ | खिरमट | डॉ. महेश केळुस्कर | ललित | रु. १८० | ५२१/२०१७ |
| ५ | जड झाले ओझे | श्री. प्रदीप कर्णिक | नाटक | रु. १५० | ६३२/२०१७ |
| ६ | सुखालाही भोवळ आली | श्री. प्रदीप कर्णिक | नाटक | रु. १०० | ६३३/२०१७ |
| ७ | अपुर्णांक | सौ. वृंदा दिवाण | कथा | रु. १९० | ९२६/२०१७ |
| ८ | छबीच्या पप्पांची गोष्ट | सौ. वृंदा दिवाण | कथा | रु. १७० | ९२७/२०१७ |
| ९ | वारीत वेचलेले | श्रीमती स्वाती लोंढे | ललित | रु. ३०० | १०२८/२०१७ |
| १० | दु:ख सावज आणि इतर कथा | श्री. चंद्रकांत भोंजाळ | कथा | रु. २०० | १०४७/२०१७ |
| ११ | मैत्र | श्रीमती नीला सत्यनारायण | कथा | रु. १६० | १०४८/२०१७ |
| १२ | माझे मुक्तांगण | डॉ. भारतकुमार राऊत | ललित | रु. २४० | ११७९/२०१७ |
| १३ | गुलदस्ता | श्री. जंयत कुलकर्णी | ललित | रु. ५०० | १२३५/२०१७ |
| १४ | स्वरसाक्षी | श्री. कृष्णकुमार गावंड | आठवणी | रु. २७५ | १२४०/२०१७ |

## मोनिका प्रकाशनाची २०१७ मधील शासनमान्य यादीतील पुस्तके

| अनु | ग्रंथाचे नाव | ग्रंथाचे लेखक | ग्रंथाचा प्रकार | किंमत | शा. मा. नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुठे शोधीसी रामेश्वर | सौ. शुभांगी पासेबंद | प्रवास | रु. २२० | १३३६/२०१७ |
| २ | पताका | सौ. मुक्ता केणेकर | ललित | रु.२०० | ६७९/२०१७ |

* * *